दारू न दिल्याने मजूराचा खून करणाऱ्या आरोपीस जन्मठेप

उमरी रेल्वे गेटजवळच्या दुकानात चाकूने भोसकून केला होता आरोपीने खून

लोकमत न्यूज नेटवर्क

अकोला : मोठी उमरी परिसरातील रेल्वे गेटजवळ असलेल्या एका दारूच्या दुकानातील कामगाराचा चाकूने भोसकून त्याची हत्या करणाऱ्या आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालयाने गुरुवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. रणजित तुकाराम वाघ (३०, रा. सिद्धार्थनगर, मोठी उमरी) असे आरोपीचे नाव आहे.

सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे गेटजवळ असलेल्या दारूच्या दुकानात आरोपी रणजित तुकाराम वाघ हा २०१८ मध्ये दारू पिण्यासाठी गेला होता. त्यावेळी पैसे नसल्याने आरोपीने फुकटात दारू मागितली. मात्र, दारूच्या दुकानातील मॅनेजर विकास विकासराव गुरव (४४, रा. मोठी उमरी) व कामगार श्रीकांत सोनकुले यांनी दारू देण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपीने दुकानात येणाऱ्या ग्राहकांना दारूसाठी पैसे मागितले. त्यामुळे विकास गुरव व सोनकुले या दोघांनी त्याला दुकानाच्या बाहेर काढले. यावेळी रणजित वाघ याने बाजूला असलेल्या एका दुकानातून चाकू उचलत दुकानात घुसून श्रीकांत सोनकुले यांच्या पोटात भोसकला. त्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या श्रीकांतचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्यात कलम ३०२, ३०७, ४५२, ४५०, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सुनील प्रल्हाद सोळंके यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. जिल्हा व सत्र न्यायालयाने दोन्ही पक्षांची बाजू ऐकल्यानंतर आरोपी रणजित वाघ याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सरकार पक्षाची बाजू ॲड. आर. आर. देशपांडे यांनी मांडली. पैरवी अधिकारी श्रीकृष्ण पाचपोर, एएसआय श्रीकांत गावंडे यांनी कामकाज पाहिले.



न्यायालयाचा निकाल

कलम ३०२ अन्वये : जन्मठेप व ५ हजार रुपये दंड. दंड न भरल्यास ५ वर्षे साधी कैद.

कलम ४५० अन्वये : ५ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड. दंड न भरल्यास ९० दिवस साधी कैद.

कलम ४५२ अन्वये : ५ वर्षे सश्रम कारावास व ५०० रुपये दंड. दंड न भरल्यास ९० दिवस साधी कैद.

कलम ५०६ अन्वये : ३ वर्षे सश्रम कारावास व ५०० रुपये दंड. दंड न भरल्यास ९० दिवस साधी कैद.

कलम ५०४ अन्वये : निर्दोष मुक्त.

'प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या द्या!'

लोकमत न्यूज नेटवर्क

अकोला : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शासकीय सेवेतील एकूण जागांच्या ५० टक्के जागा आरक्षित ठेवून प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्यात यावे, अशी मागणी सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटना अकोला जिल्ह्याच्या वतीने गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

विविध प्रकल्पांसाठी १९८५ पूर्वी भूसंपादन करण्यात आलेल्या कुटुंबातील दोन सदस्यांना शासकीय सेवेत नोकरी मिळण्याकरिता प्रमाणपत्र देण्यात आले. मात्र, त्यांना अद्याप उपयोग झाला नसल्याचा आरोप करत शासकीय सेवेतील एकूण जागांच्या ५० टक्के जागा प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित ठेवून शासकीय सेवेत समाविष्ट करण्याची मागणी सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेच्या वतीने निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष पुरी, गजानन बोरकर, अभिजित भोजने, किशोर कोरडे, राजेश वाघमारे, रवींद्र [illegible], विजय सरकटे, श्रीराम लोखंडे, एकनाथ ओव्हळे, नदीम खान आदी पदाधिकारी उपस्थित होते.

भगवान महावीर यांचा रथोत्सव

अकोला : दिगंबर जैन समाजाच्या परंपरेनुसार यावर्षीही पर्युषण पर्वानिमित्त क्षमावाणी दिवसानिमित्त भगवान महावीर यांचा रथोत्सव काढण्यात आला. हा सोहळा गुरुवारी दि. १२ सप्टेंबर आयोजित करण्यात आला होता. सकाळी दिगंबर जैन समाजाच्या वतीने शहरातील मार्गाने रथोत्सवाची नगर परिक्रमा संपन्न झाली. त्यानंतर रथोत्सवाचा समारोप पार्श्वनाथ जैन मंदिरात करण्यात आला. मंदिर परिसरात भाविकांसाठी प्रसाद व आरतीचे आयोजन करण्यात आले. या वेळी उपस्थित भाविकांना [illegible] यांच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले. समाजातील सर्व वयोगटातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने सोहळा अधिकच उत्साहपूर्वक झाला.

महसूल सेवक संघटनेचे आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

अकोला : विदर्भ महसूल सेवक संघटनेच्या वतीने महसूल सेवकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी १५ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालयात धरणे देण्यात आले.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष रणजित सोळंके यांच्या नेतृत्वात विवेक देशमुख, नितीन चंदन, सागर चाकर, अनिकेत ठोंबरे, पंकज गिरोडे, अभिनाश आखरे, ओमप्रकाश आवारे, गोपाल कार्लेकर, नीलेश देवर, राजू शिरसाट, सुनील ढोणे, कुणाल शिरसाट, नितेश घाटे, उल्हास इंगोले, भाऊराव [illegible], दीपाली सोनोने, सागर गवई, सुनील पाटे, अमोल कुंभारे, निलेश इंगळे, भोजराज सोळंके आदींसह पदाधिकारी व सदस्य सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील ३०० कोटींची विकासकामे मार्गी लागणार कधी?

लोकमत वृत्त मालिका

विकास कामांचा बोजवारा भाग २

अकोला : जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत जिल्ह्यातील प्रस्तावित विविध विकासकामांसाठी मंजूर निधी खर्च करण्यास सहा महिन्यांचा कालावधी उरला असताना ३०० कोटींच्या कामांना मान्यतेची प्रक्रिया अद्याप बाकी असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विकासकामे मार्गी लागणार तरी कधी, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी ३३३ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. मंजूर निधी मार्च अखेरपर्यंत प्रस्तावित विकासकामांवर खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आवश्यक असलेल्या तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनामार्फत जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

२३२ कोटी मिळणार केव्हा?

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत जिल्ह्यातील कामांसाठी चालू आर्थिक वर्षात ३३३ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी आतापर्यंत १०१ कोटी रुपयांचा निधी जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाला प्राप्त झाला आहे.

उपलब्ध निधीपैकी काही निधी गेल्या वर्षातील कामांच्या दायित्वापोटी तर काही निधी विविध योजनांच्या मान्यतेनुसार नवीन कामांसाठी वितरित करण्यात येत आहे. उर्वरित २३२ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी हा निधी शासनाकडून केव्हा मिळणार, याबाबत प्रतीक्षा केली जात आहे.

चालू वर्षातील आता सहा महिन्यांचा कालावधी उरला असताना, मंजूर निधीच्या तुलनेत आतापर्यंत केवळ ३३ कोटी रुपयांच्या निधीतील विकासकामांना मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून ३०० कोटींच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया पूर्ण होणे अद्याप बाकी आहे. मान्यतेची प्रक्रिया रेंगाळल्यामुळे येत्या सहा महिन्यांत जिल्ह्यातील प्रस्तावित विकासकामे केव्हा मार्गी लागणार, असा प्रश्न निर्माण होत आहे.

पुढील पाच दिवस पावसाची शक्यता

अकोला : नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला जिल्ह्यात १२ ते १६ सप्टेंबरदरम्यान पावसाची शक्यता वर्तविली आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे नदी, नाले आणि तलावांमधील जलसाठा वाढला असून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. वीज, वारा आणि पावसापासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहन केले आहे.

सदनिकेचे अभिहस्तांतरण करणे आवश्यक

अकोला : अपार्टमेंटमधील सदनिका किंवा सोसायटीत घर घेतल्यानंतर अनेकजण पुढील कायदेशीर प्रक्रियेची माहिती करून घेत नाहीत. मात्र, अशा मिळकतींचे अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) करणे आवश्यक आहे. सर्व गृहनिर्माण संस्थांनी ही प्रक्रिया करून घेण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील पहिल्या मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात सध्या ५०० हून अधिक गृहनिर्माण संस्था असून, त्यापैकी सुमारे ४० संस्था सदनिकाधारक किंवा गाळेधारकांच्या आहेत. तथापि, बहुतांश सोसायट्यांनी अद्याप अभिहस्तांतरण केलेले नाही. संस्थेच्या नावावर जमिनीची थेट मालकी हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेस मानीव अभिहस्तांतरण म्हणतात. विकासक सहकार्य करण्यास नकार देत असल्यास जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून ही प्रक्रिया एकतर्फी पूर्ण केली जाऊ शकते. त्यामुळे सोसायटीला जमिनीची कायदेशीर मालकी मिळते आणि पुनर्विकासाचे सर्व अधिकार प्राप्त होतात.

बीएआरसी हॉस्पिटल
अणुशक्ती नगर, मुंबई

[illegible] मुलाखत [illegible] बीएआरसी (बार्क) हॉस्पिटलमध्ये [illegible] २०२५ रोजी घेण्यात येईल.

[illegible] सप्टें. २५	[illegible]
[illegible] सप्टें. २५	[illegible]
[illegible] सप्टें. २५	[illegible]

वेळ : १०.३० ते १२.०० वाजेपर्यंत
[illegible]
बीएआरसी(बार्क) वेबसाइट : www.barc.gov.in
[illegible]
cbc48162/12/0003/2526

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार) मुंबई - ३२.
शासन पत्र क्र.- [illegible] दिनांक- ११ सप्टेंबर, २०२५.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगावरील अध्यक्ष आणि ४ सदस्य यांची एकूण पाच रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

सही/-
(वर्षा देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन
(DGIPR-2534/ [illegible])

होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन
टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च
राष्ट्रीय ऑलिम्पियाड कार्यक्रम २०२५-२०२६
ॲस्ट्रोनॉमी, बायोलॉजी, केमिस्ट्री, फिजिक्स,
ज्युनिअर सायन्समध्ये

या कार्यक्रमाचे पहिली पायरी **इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी)** द्वारे २३ व ३० नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित केल्या जाणाऱ्या **राष्ट्रीय मानक परीक्षा (एनएसई)** (विज्ञान विषयांतर्गत) मध्ये अव्वल ठरणे आहे.

एनएसईमध्ये [illegible] २०२६ **च्या [illegible] आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये** भारताचे प्रतिनिधित्व [illegible].

नावनोंदणी करण्यासाठी :
NSEs: https://www.iapt.org.in (१५ ऑग. - १५ सप्टें., २०२५)
अधिक माहितीसाठी : https://olympiads.hbcse.tifr.res.in
https://www.iapt.org.in

CBC 48143/12/0008/2526

OMKARA
ASSETS RECONSTRUCTION PVT. LTD.
ओंकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.

[illegible]

दक्षिण मध्य रेल्वे

ई-लिलाव सूचना - [illegible]

[illegible]

A1414

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर
(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा प्रादेशिक घटक)
गृहनिर्माण भवन, सिव्हील लाईन्स, टेंपल रोड, नागपूर - ४४०००१

ई-निविदा सूचना क्र. ०२
वेब पोर्टल : http://mahatenders.gov.in

मुख्य अधिकारी / नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण घटक) यांचे [illegible] ई-निविदा [illegible] आहे.

ऑनलाईन ई-निविदा वेळापत्रक

अ. क्र.	तपशील	दिनांक व वेळ
१	निविदा जाहिरात तारीख	१५/०९/२०२५
	निविदा कागदपत्रे डाऊनलोड करण्याची तारीख	१६/०९/२०२५ (सायंकाळी ५.३० नंतर)
	पूर्वनिविदा बैठक (नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सिव्हील लाईन, नागपूर)	२५/०९/२०२५ (दुपारी ३.३० वाजता)
२	निविदा सादर करण्याची अंतिम तारीख (अंतिम मुदत)	३०/०९/२०२५ (सायंकाळी ५.३० पर्यंत)
	तांत्रिक बोली उघडणे (नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सिव्हील लाईन, नागपूर)	०१/१०/२०२५ (दुपारी ३.३० नंतर)
	आर्थिक बोली उघडण्याची तारीख	[illegible]

अटी व शर्ती : १) [illegible] https://mahatenders.gov.in [illegible] https://mhada.gov.in [illegible]
२) [illegible] https://mahatenders.gov.in [illegible]
३) [illegible]
४) [illegible] https://mahatenders.gov.in [illegible]
५) [illegible]
६) [illegible]
७) [illegible]
८) [illegible] https://mahatenders.gov.in [illegible]
९) [illegible]

डॉ. [illegible]
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर

दिनांक : [illegible]